# निशाणी ४३ व ४६ वर संयुक्त आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश १ नियम १० (२) नुसार त्यांचे नाव प्रतिवादीपणातून वगळणेकरिता दाखल केले आहे.

२. सदर दावा वादीने दावा मिळकतीच्या मालकी ठरावाकरिता व प्रतिवादींविरूध्द निरंतर मनाई हुकूम मिळणेकरिता दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी वादीची परवानगी न घेता मिळकतीतून वाहनांची ये—जा करीत आहेत. प्रतिवादी क्र. ३ व ४ च्या मते, जेटटी बांधणेकरिता आवश्यक ते प्राथमिक काम करण्याकरिता प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कंत्राटदार म्हणून नेमणुक केली असून प्रतिवादी क्र. २ यांनी सदरचे काम मे. ठाकूर म्हात्रे जॉइंट वेचर या असोसिएटस ऑफ पर्सन संस्थेची नेमणुक केली आहे. सदरहू प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी वैयक्तिक रित्या कोणत्याही ठेका प्रतिवादी क्र. १ किंवा २ यांना दिलेला नाही व त्यांचा या दाव्याशी वैयक्तिकरित्या कोणताही संबंध नाही. सबब, दाव्यातील प्रतिवादीचे नाव वगळण्यात यावे अशी विनंती केली.

३. वरील दोन्ही अर्जांना वादीने निशाणी ५० व ५१ अन्वये म्हणणे दाखल करून जोरदार हरकत नोंदविली. वादीच्या मते प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी दिलेला अर्ज बेकायदेशीर असून याआधी रे.मु.नं. ०१/२०१६ मध्ये प्रतिवादी क्र. १ ने दि.१०/०१/२०१५ पासून त्यांचे ठेकेदार व उपठेकेदार जे.एन.म्हात्रे इन्फ्रास्टक्चर प्रा.लि. व ठाकूर इन्फ्रास्टक्चर प्रा.लि. यांचेमार्फत प्रकल्प उभारणीचे काम सुरू असल्याचे नमूद केले आहे. सबब, प्रतिवादी क्र.

३ व ४ यांना कायदेशीररित्या प्रस्तुत अर्ज दाखल करण्यासाठी कोणतेही कारण नाही.

४. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांवरून असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र. ३ व ४ चा जेटटी बांधणेकरिता सुरू असलेल्या प्रकल्पामध्ये वैयक्तिक रित्या संबंध दिसून येत नाही परंतु ठाकूर, म्हात्रे जॉइंट वेचरचे ते सदस्य आहेत किंवा नाहीत हे कोठेही स्पष्ट होत नाही. तसेच प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादीकडेही संबंधीत कागदपत्र नाहीत आणि प्रतिवादीनेही असोसिएशन ऑफ पर्सन किंवा जॉइंट वेचर संबंधीचे कागदपत्र दाखल केलेले नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. ४ ने निशाणी ४६ च्या अर्जात केलेल्या कथनानुसार वादीचा दावा संदर्भहिन किंवा आर्थिक लाभ घेण्याकरिता दाखल झालेला असेल तर सदरचे विधान सिध्द करण्यासाठी किंवा दाव्यातील खरी परिस्थिती न्यायालयासमोर आणण्यासाठी प्रतिवादी क्र. ३ व ४ यांची उपस्थिती दाव्यात असणे महत्वाचे आहे. सबब, याघडीला प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना प्रतिवादीपणातून वगळणे योग्य होणार नाही. वरील चर्चेअंती दोन्ही अर्ज नाकारण्यात येत आहेत. आदेश खालील प्रमाणे.

## आदेश

अर्ज फेटाळण्यात येत आहे.

उरण (एस.एस.जैन)
दि.१३/०२/२०१७ सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, उरण